पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १

**सभावृत्तांत**

दिनांक - **१४/१०/२०१६** वेळ - सकाळी **११.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पहिली सभा (विशेष सभा) शुक्रवार दिनांक **१४/१०/२०१६** रोजी सकाळी **११.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस **मा. श्री.दौलत देसाई, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे** व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.नंदा विकास ताकवणे
२. मा.आल्हाट मंदा उत्तम
३. मा.भारती फरांदे
४. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ

या शिवाय मा.दिलीप गावडे - सह आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.डोईफोडे – सहा.आयुक्त, मा.लावंड - कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

( मा.विधी समितीच्या सभापती पदाची निवडणूक पार पाडणेसाठी कामाकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे नोंद घेण्याची व्यवस्था ठेवण्यात आली आहे. )

----------

**मा.पीठासीन प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पुणे** - सर्वांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत मा.विधी समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा. विभागीय आयुक्त यांनी सभेचा पीठासीन प्राधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केली आहे.

**मा.नगरसचिव -** विषय क्र.१ - मा.विधी समितीच्या सभापतीची नेमणूक करणे.
मा.विधी समितीचेसभापती पदासाठी नेमणूक करणेकामी एक नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले आहे. त्यामधील उमेदवार, त्याचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मा.आल्हाट मंदा उत्तम | मा.नंदा विकास ताकवणे | मा.भारती फरांदे |

( मा.नगरसचिव यांनी त्यांना प्राप्त झालेले उपरोक्त एक नामनिर्देशन पत्र मा.पीठासीन प्राधिकारी यांचेकडे सुपूर्त केले. मा.पीठासीन प्राधिकारी यांनी त्याची छाननी केली )

**मा.पीठासीन प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पुणे** - मा.विधी समितीचे सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या उपरोक्त एका नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली असून ते नामनिर्देशनपत्र वैध ठरलेले आहे. सभापती विधी समिती पदाकरीता वैधपणेनामनिर्देशित केलेल्या उमेदवाराचे नाव पुढील प्रमाणे आहे.

**१) मा.आल्हाट मंदा उत्तम**

कोणत्याही उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस पीठासीन प्राधिकारी यांचेकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल. अशी तरतूद असल्याने त्याप्रमाणे १५ मिनिटांचा अवधी देण्यात येत आहे.
(मा.पीठासीन प्राधिकारी यांनी उमेदवारी मागे घेणेसाठी दिलेला सकाळी **११.०५** ते सकाळी **११.२०** हा **१५** मिनिटांचा अवधी संपला.)

**मा. पीठासीन प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पुणे** - उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या अवधीमध्ये उमेदवारी मागे घेतलेली नसल्याने मा.विधी समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.आल्हाट मंदा उत्तम** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.आल्हाट मंदा उत्तम** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करण्यात येत आहे.

ठराव क्रमांक ०१ विषय क्रमांक - ०१

दिनांक - १४/१०/२०१६ विभाग - नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समिती सभापती पदासाठी एक नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेले असून वैध ठरलेले आहे. त्यामध्ये मा.विधी समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या **मा.आल्हाट मंदा उत्तम** या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.आल्हाट मंदा उत्तम** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करण्यात येत आहे.

सही/-

**( दौलत देसाई )**

**पीठासीन प्राधिकारी तथा**

मुख्य कार्यकारी अधिकारी

विधी समिती (विशेष सभा)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी – ४११ ०१८.



**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी ४११ ०१८.

( नवनिर्वाचित सभापती **मा.आल्हाट मंदा उत्तम** यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले. )

मा.नगरसचिव - विषय क्र.२ - मा.विधी समिति उपसभापतीची नेमणूक करणे. मा.विधी समितीचे उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेले नाही.

----------

ठराव क्रमांक - ०२ विषय क्रमांक - ०२
दिनांक - १४/१०/२०१६
सुचक : मा.गोरक्ष लोखंडे अनुमोदक : मा.नंदा ताकवणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीच्या उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झालेले नसल्याने मा.विधी समितीच्या उपसभापतीची नेमणूक मा.सभापती निश्चित करतील त्या विशेष सभेत करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ०३ विषय क्रमांक - ०३
दिनांक - १४/१०/२०१६
सुचक : मा.गोरक्ष लोखंडे अनुमोदक : मा.नंदा ताकवणे

मा.विधी समितीची सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिस-या शुक्रवारी दुपारी ३.०० वा. विशेष समिती सभागृहात भरविण्यात यावी. तथापी सदर दिवशी कार्यालयास सुट्टी/सुट्टया असलेस त्या सुट्टी / सुट्टयांनंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३.०० वा. सभा भरविण्यात यावी. तसेच कोणीही सन्मा.सदस्य उपस्थित नसल्याने होऊ न शकणारी सभा मा.सभापती निश्चित करतील त्या दिवशी व त्या वेळी भरविण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( आल्हाट मंदा उत्तम )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५५७/२०१६
दिनांक : १४/१०/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 201६ sub committee sabhapati.doc